**<u>प्रेसनोट</u>**

**दत्तवाडीपो.स्टे.पुणे दि.१२/०४/२०१९**

**"अपहार केलेल्या सोन्याच्या वस्तु पोलीसांकडुन परत मिळाल्याचा आनंद"**

श्री. स्वप्निल सतीश कोठारी, यांचा गोल्ड मॅन्यु फॅक्चरिंगचा व्यवसाय असुन ते विजयलक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३, धनी वेलनकरनगर पर्वती पुणे येथे राहण्यास आहेत. त्यांनी त्यांची व्यवसाय वृध्दी करण्यासाठी मुंबईतील त्यांचा ओळखीचा कारागीर नामे-राकेश खेतमल मेहता,वय- ३५ वर्षे,रा.जितेकर वाडी, चिरा बाजार, मुंबई यास बुसा उद्योग भवन पहीला मजला गाळा नं. १०३ शिवडी मुंबई येथे गोल्ड मॅन्यु फॅक्चरिंगचे वर्कशॉप टाकुन दिले होते. त्याचा सर्व व्यवहार राकेश मेहता हा स्वतः पाहत होता. फिर्यादी स्वप्निल कोठारी हे त्यांचेकडील सोन्याची लगड व तुकडे यांचे ऑर्डर प्रमाणे दागिने बनविण्यासाठी विश्वासाने राकेश मेहता याचेकडे देत असत व तोत्याचे दागिने बनवुन परत स्वप्निल कोठारी यांना देत असे. परंतु राकेश मेहता यांनी ०१ एप्रिल २०१८ ते ०४ जुन २०१८ दरम्यान वेळोवेळी सोन्याचे दागिने बनविण्यासाठी सोने नेऊन ते दागिनेन बनविता त्यांच्या राहत्या घरी कोणास काही न सांगता फसवणुक करण्याच्या इराद्याने निघुन गेले होते.त्यांनतर फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर स्वप्निल सतीश कोठारी यांनी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली होती.त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अनिल डफळ, पोलीस हवालदार तानाजी निकम, सुधीर घोटकुले, महेश गाढवे, सोमेश्वर यादव यांनी अत्यंतचाणाक्षपणे तपास करुन आरोपीच्या वरील वर्कशॉप व राहते घरी मा. न्यायालयाच्या परवानगीने सर्च वॉरंट नुसार झडत्या घेवुन तेथुन ११६३.१९ ग्रॅम वजनाचे व ३४ लाख ७७ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम १,४१,७००/-रु हे जप्त केले होते. त्यानंतर आरोपीस दाखल गुन्ह्यात दि. २१/११/२०१८ रोजी १९/०० वा. अटक केले असुन आरोपी सध्या येरवडा जेल येथे न्यायालयीन कोठडीत आहे.

त्यानुसार फिर्यादी स्वप्निल कोठारी यांनी आपला अपहार झालेला माल परत मिळावा या करीता न्यायालयाचा आदेश प्राप्त करुन घेतला. त्याप्रमाणे त्यांचा ३४ लाख ७७ हजार रुपये किंमतीचा सोन्याच्या दागिन्याचा गेलेला मुद्देमाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे, पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांच्या उपस्थितीत परतकरण्यात आला. त्यावेळेस स्वप्निल कोठारी यांनी पोलीस विभागाने अत्यंत तत्पर तपास करुन आमचा अपहार झालेले सोन्याचे दागिने परत मिळवुन दिल्याबद्दल समाधान व्यक्तकेले.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर


देविदास घेवारे
वरिष्ठ पोलीस निरीक्षक